# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून विमाननगर, बाणेरगांव व भोसरी परिसरातून नव्याने बस सेवा सुरु होणार.

- नव्याने ३ मार्ग होणार सुरु.
- गर्दीच्या वेळेत बससेवा.
- विद्यार्थी, कामगार व प्रवाशांच्या सोयीसाठी सेवा.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून बुधवार दि. १८/०४/२०२३ पासून प्रवाशांच्या वाढत्या मागणी नुसार खालील मार्गावर गर्दीच्या वेळेत नव्याने बससेवा सुरु करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | मार्ग क्र. | मार्ग पासून - पर्यंत | मार्गे |
|---|---|---|---|
| १ | १७९ | विमाननगर ते हडपसर | खराडी बायपास, मुंढवा, मगरपट्टा |
| २ | २५५ | विमाननगर ते हिंजवडी माण फेज ३ | पुणे स्टेशन, मनपा भवन, औंधगांव |
| ३ | २५८ | मनपा भवन ते बाणेरगांव (राधा चौक) | मोहननगर, ननावरेनगर, पॅनकार्ड क्लब |

सदर बस मार्ग सुरु होत असल्याने यामार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना किफायतशीर दरात सुरक्षित सेवा उपलब्ध होणार आहे, तरी जास्तीत-जास्त प्रवासी नागरिकांनी या बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे. प्रवासी संख्या व उत्पन्नात वाढ झाल्यास या मार्गांवर आणखी बसेस वाढविण्यात येतील.

---

(चौकट)

## दि. १९ एप्रिल पासून भोसरीगांव ते देहूगांव हा बसमार्ग होणार सुरु

दि. १९ एप्रिल २०२३ पासून मार्ग क्र. ३५६ भोसरीगांव ते देहूगांव हा बसमार्ग प्रवाशांच्या सोयीसाठी सुरु करण्यात येणार असून हा मार्ग मोशी, बोराडेवाडी, चिखली, तळवडे असा संचलनात राहणार आहे.

---

दि. १७/०४/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.